

| वर्ष - 7 | अंक - 196 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 24 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- जगज्जेते 'सूर्य' तेजाने होरपळले!
- 'आंख मारे' या गाण्यावर डान्स
- रतन टाटांचा वारसदार ठरला?
- व्हॉट्सअ‍ॅपवरची ब्लू टिक दाखवा!

## शिरुरसाठी अमोल कोल्हे-अजित पवार 'महायुती'ची शक्यता

# 'इंडिया आघाडी'ची उमेदवारी कुणाला?

## »विलास लांडे, शिवाजीराव आढळराव यांच्या भूमिकेकडे लक्ष






| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील फुटीनंतर दोन्ही गटांच्या आमदार-खासदारांच्या निलंबनाची मागणी होवू लागली. राजकीय वातावरण तापलेले असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी घाईघाईत भेट घेतल्यामुळे डॉ. कोल्हे 'महायुती' च्या गळाला लागले का? अशी चर्चा जोर धरु लागली आहे.**






राष्ट्रवादी पक्षनाव आणि चिन्हाबाबत निवडणुक आयोगात सुनावणी सुरू असतांनाच आता संसद भवनातही वाद सुरू झाला आहे. अजित पवार गटातील खासदार प्रफुल्ल पटेल यांचे राज्यसभेचं सदस्यत्व रद्द करण्यात यावे, यासाठी शरद पवार गटाच्या खासदारांनी उपराष्ट्रपती जगदीप धनगड यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे.

त्यालाच प्रत्युत्तर म्हणून आता शरद पवार गटातील चार खासदारांना निलंबित करण्यात यावे, यासाठी अजित पवार गटाकडून लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांच्याकडे मागणी केली आहे. विशेष म्हणजे, शरद पवार गटातील काही खासदारांना यातून वगळ्यात आले असल्याने राजकीय वातावरण पुन्हा संभ्रम निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, अजित पवार गटाकडून शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांचे नाव वगळले आहे. यातच आता अमोल कोल्हे अजित पवारांच्या भेटीला गेल्याने राजकीय वर्तुळात एकच चर्चा सुरू झाली आहे.

### अमोल कोल्हे यांची भूमिका...

»अजित पवार हे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. गेली अनेक वर्ष पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे असेल, इंद्रायणी मेडीसीटी असेल या अत्यंत महत्वाच्या प्रकल्पांसाठी अजितदादांनी महत्वाची भूमिका सुरूवातीपासून घेतली आहे. या प्रकल्पांचा पाठपुरावा आणि इतर प्रकल्पांबाबत चर्चेकरीता भेट झाल्याचे अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे.

### ...तर इंडिया आघाडीकडून लांडे किंवा आढळराव

»खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अजित पवार गटाशी जुळवून घेतल्यास आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना- राष्ट्रवादी (अजित पवार गट) महायुतीचे उमेदवार म्हणून डॉ. कोल्हे यांना उमेदवारी देण्यात येईल. त्यामुळे राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास लांडे आणि शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना इंडिया आघाडीकडून उमेदवारी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे खासदारांच्या निलंबनाची मागणी आणि अजित पवार- अमोल कोल्हे यांची झालेली भेट यातील गुपित निवडणुकीच्या उमेदवारी निश्चित होईपर्यंत कायम राहील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# स्पाईन रोड बाधितांच्या भूखंडावर अतिक्रमण!

## »सेक्टर 11 येथील धक्कादायक प्रकार; पीएमआरडीए, महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकातून जाणाऱ्या स्पाईन रस्त्यात बाधित होणाऱ्या रहिवाशांचा पुर्नवसनाचा प्रश्न अद्याप पूर्णत: सुटलेला नसतानाच संबंधित लाभार्थ्यांना आरक्षित केलेल्या भूखंडावर अतिक्रमण सुरू झाले आहे. मात्र, याकडे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महापालिका प्रशासनाने सोईस्कर दुर्लक्ष केले आहे.**



स्पाईन रस्ता बाधितांसाठी 126 रहिवाशांच्या पुर्नवसनासाठी आवश्यक असलेला पेठ क्रमांक 11 येथील भूखंडावर जागा देण्यात आली आहे. त्या ठिकाणी अद्याप लाभार्थ्यांनी बांधकामे सुरू केलेली नाहीत. तत्पूर्वीच या भूखंडावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

स्पाईन रस्ता विकसित करत असताना त्रिवेणीनगर चौकातील काही घरे बाधित होत आहेत. त्या घरांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी गेल्या १४ वर्षांपासून प्रलंबित होती. दरम्यान, महापालिका प्रशासनाने लाभार्थ्यांना 1250 स्के.मी.भूखंडाचा परतावा देण्याची प्रक्रिया सुरू केली. अद्याप काही बाधितांना तांत्रिक अडचणींमुळे काहीना जागा तर बऱ्याच जणांना अलॉटमेंट लेटर देखील मिळालेले नाही. असे असताना मोकळ्या भूखंडावर होणारे अतिक्रमण प्रशासन रोखणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### प्रशासनाची बघ्याची भूमिका...

**» लाभार्थ्यांना आरक्षीत जागेवर पत्राशेडचे काम बेकायदेशीपणे सुरू आहे. याबाबत स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाने टाळाटाळ केली जात आहे. महापालिका प्रशासनाने वाटप केलेल्या भूखंडावर अतिक्रमण होत आहे. प्रकल्पबाधित नागरिकांना दिलेल्या जागांवर अतिक्रमण होत असेल आणि प्रशासन बघ्याची भूमिका घेत असेल, तर दाद कुणाला मागायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

# ‘ससून’चा कारभार अधांतरी!

## नवीन अधिष्ठात्यांच्या नियुक्तीचा आदेशच नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बी . जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदावरून डॉ. संजीव ठाकूर यांना राज्य सरकारने पदमुक्त केले होते. त्याच दिवशी उच्च न्यायालयानेही डॉ. ठाकूर यांची नियुक्ती रद्द करून आधीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यानंतर डॉ. काळे हे अधिष्ठातापदाचा कार्यभार स्वीकारून लगेचच रजेवर गेले.**



मात्र, तब्बल ११ दिवसांनंतरही डॉ. काळे यांच्या नियुक्तीचा आदेश न निघाल्याने ससूनचा कारभार अधांतरी सुरू आहे. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने १० नोव्हेंबरला रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले. राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले तर अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते यांना निलंबित केले. त्यामुळे अधिष्ठातापद रिक्त झाल्याने डॉ. काळे यांनी तातडीने ११ नोव्हेंबरला या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. काळे हे कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच रजेवर गेले. त्यानंतर अद्याप ११ दिवसांनंतरही त्यांच्या नियुक्तीचा आदेश निघालेला नाही. सध्या ससूनच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. शेखर प्रधान यांच्याकडे आहे. विशेष म्हणजे सेवा ज्येष्ठतेनुसार डॉ. श्रीनिवास शिंत्रे यांच्याकडे हा अतिरिक्त कार्यभार सोपविणे आवश्यक होते. मात्र, ते रजेवर असल्याने डॉ. प्रधान यांच्याकडे ही जबाबदारी आली आहे. त्यामुळे अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार कोणीच स्वीकारण्यास तयार नसल्याची चर्चा ससूनमध्ये रंगली आहे. ललित पाटील ड्रग्स प्रकरणात सध्या (Lalit Patil Drug Case) ससून रुग्णालयातील वॉर्ड नंबर 16 मधील क्लार्क आणि नर्स यांची चौकशी करण्यात येत आहे. पुणे पोलिसांकडून ही चौकशी करण्यात येत आहे.

ललित पाटीलचा ससून रुग्णालयातील मुक्काम वाढवण्यात हे क्लार्क आणि नर्स प्रयत्नशील होते का?, त्यांनी ललिच पाटीलला कोणत्या प्रकारची मदत केली आहे का? याची सध्या चौकशी करण्यात येत आहे. पुणे पोलिसांचा रोख हा ससून रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर केंद्रीत झाला आहे. ललित पाटीलच्या मुक्कामासाठी नक्की कोण प्रयत्न करत होते? आणि ललित पाटीलला ससूनमधून पळून जाण्यासाठी कोणी मदत केली? ही माहिती घेण्यासाठी पुणे पोलिसांनी आता कंबर कसली आहे. त्यामुळे ही चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणात ससूनमध्ये काम करणाऱ्या क्लार्क महेंद्र शिवटे यांचं नाव सातत्याने समोर येत आहे. शिवटे हे कैद्यांना कुठे आणि किती दिवस ठेवायचं यात सहभागी असतात त्यामुळे त्यांच्यावर संशय व्यक्त केला जात आहे. ड्रग्स माफिया ललित पाटील याला दाखल करण्यास आता ससून रुग्णालयाचा नकार देत आहे. ड्रग्स तस्कर ललित पाटील याला ससून रुग्णालय प्रशासन आता दाखल करून घ्यायला तयार नाहीत.ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेल्यानंतर डॉक्टर आणि पोलिसांवर संशय होता. त्यानंतर या दोघांनीही ललित पाटीलला मदत केल्याचं पुढे आलं. त्यानंतर अनेक जणांवर संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणी दोन पोलिसांना बडतर्फ करण्यात आलं. ससून रुग्णालयातील डीन संजीव ठाकूर यांना पदमुक्त करण्यात आलं आणि डॉ. देवकाते यांना निलंबित करण्यात आलं. या सगळ्या प्रकरणानंतर आता ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी धास्ती घेतली आहे. त्यामुळे त्याला रुग्णालयात भर्ती करुन घेत नाही आहे. त्याच्यावर उपचार करुन त्याला परत पाठवण्यात येत आहे.

### सगळ्या डॉक्टरांची चौकशी होणार...

» या प्रकरणात आतापर्यंत अनेकांची चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीत ससूनचे डीन संजीव ठाकूर हे दोषी आढळल्याने त्यांना पदमुक्त करण्यात आलं आहे तर डॉ. देवकाते आहे त्यांचं निलंबन करण्यात आलं आहे. आता क्लार्क आणि नर्सेसची चौकशी करण्यात येत आहे. मात्र ही चौकशी इथेच थांबणार नसून वॉर्ड नंबर 16 मध्ये कार्यरत असलेल्या सगळ्याच डॉक्टरांची चौकशी होणार आहे. ससूनचा X-RAY विभागातील सगळ्यांची चौकशी होणार आहे. X-RAY काढण्यासाठी 2 ऑक्टोबरला ललित पाटीलला 16नंबर वॉर्डमधून बाहेर काढण्यात आलं होतं आणि त्यादरम्यान तो पळाला होता. त्यामुळे X-RAY विभागातील सगळ्यांची कसून चौकशी करण्यात येणार आहे.

> “ डॉ. विनायक काळे यांची ससूनच्या अधिष्ठातापदी नियुक्ती करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांकडून निघणे अपेक्षित आहे. याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाने पाठविला आहे. त्यावर लवकरच कार्यवाही होणार आहे. तत्कालीन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांची पदमुक्ती आणि डॉ. प्रवीण देवकाते यांच्या निलंबनाचा आदेश त्याचवेळी तातडीने काढण्यात आला होता.
>
> – **प्रवीण वाघमारे,** सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग

# राज्यातील शाळांमध्ये आता 'वाचन चळवळ'

## 41 टक्के मुलांना मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात इयत्ता तिसरीच्या ३० टक्केपेक्षा जास्त मुलांना लहान मजकूर, पाचवीपर्यंतच्या ४१ टक्के मुलांना त्यांच्या श्रेणीचा योग्य मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले आहे. मात्र आता हे चित्र बदलण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये वाचन चळवळ राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.**



विद्यार्थी भाषा नैसर्गिकरित्या शिकतात. मात्र विद्यार्थ्यांनी वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. इयत्ता दुसरीमध्ये मुलांना वाचन येणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून वाचन होत नसल्याचे राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे २०२६ पर्यंत राज्यातील तिसरीपर्यंतचे प्रत्येक मूल ओघवते वाचन करू शकेल, आठवीपर्यंतचे प्रत्येक मूल शिकण्यासाठी वाचू शकेल हे सुनिश्चित करणारी आनंददायी वाचनाची चळवळ निर्माण करण्याच्या उद्देशाने आता राज्यात वाचन चळवळ राबवली जाणार आहे. या वाचन चळवळीत शालेय शिक्षण विभाग, राज्यसरकार, युनिसेफ, रीड इंडिया आणि प्रथम बुक्स या संस्थांचा सहभाग आहे. मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांकडून मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. राज्यातील शासनमान्य शाळा आणि खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल. मात्र खासगी शाळांना पुस्तके दिली जाणार नाहीत. उपक्रमात वर्षभरातील काही तारखा निश्चित करून शाळेत वाचन वर्ग आयोजित केले जातील. त्यात विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील. त्याशिवाय शालेय स्तरावर शाळेच्या वेळापत्रकातच साप्ताहिक दोन वाचन तासिकांचा समावेश करणे, गोष्टींचा रविवार उपक्रमाअंतर्गत दर शनिवारी ई-पुस्तके उपलब्ध करून देणे, आनंदाचा तासअंतर्गत 'ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड' या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरू होण्यापूर्वी १५-२० मिनिटे शिक्षक आणि मुलांसाठी कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळा पत्रकात समाविष्ट केला जाईल.

### ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती

» मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी लोकसहभाग, मुलांना वाचनाचे महत्त्व समजावणे, मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करणे, मुलांवर चांगले संस्कार करणे, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकांतून रसास्वादाची दृष्टी निर्माण करण्याचा या चळवळीचा उद्देश आहे. या उपक्रमासाठी ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती केली जाणार आहे.

# बलशाली भारत घडवण्याच्या राष्ट्रकार्यात योगदान द्या!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे आवाहन : नवनिर्वाचित कार्यकारिणीचा पदवाटप समारंभ

> भाजपा शहर कार्यकारिणीमध्ये समाविष्ट केलेल्या प्रत्येक पदाधिकाऱ्याकडे विशेष कौशल्य आहे. त्या कौशल्याचा वापर पक्ष संघटना सक्षमीकरणासाठी झाला पाहिजे. आगामी काळ निवडणुकीचा असल्याने कार्यकारिणी आणि कार्यकर्ता या दोघांवर मोठी जबाबदारी असणार आहे. त्या अनुशंगाने बूथ यंत्रणा सक्षम करण्यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारचे महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्प आणि कल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प आम्ही केला आहे.
> **– शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संघटनेत काम करताना 'एकमेकां सहाय्य करू' हे धोरण प्रत्येकाने अंगीकारताना आपले १०० टक्के योगदान देणे गरजेचे आहे. कार्यकारिणी आणि कार्यकर्ता हे आपल्या संघटनेची दोन चाके आहेत. या दोन्ही गोष्टीच्या माध्यमातून आपले 'उद्दिष्ट' साध्य करता येवू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जगातील बलशाली राष्ट्र म्हणून विकसित होत आहे. या राष्ट्रकार्यामध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कार्यकारिणी जाहीर केली होती. या कार्यकारीणीचा पदवाटप कार्यक्रम मोरवाडी येथील पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात बुधवारी झाला. यावेळी जगताप बोलत होते.

यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, भाजपा शहर सरचिटणीस शीतल शिंदे, शैला मोळक, अजय पाताडे, संजय मंगोडीकर, नामदेव ढाके, मावळ विधानसभा संयोजक सदाशिव खाडे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळुराम बारणे, भाजयुमो शहराध्यक्ष तुषार हिंगे, शहर अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष भीमा बोबडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुजाता पालांडे, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, संतोष तापकीर आदी उपस्थित होते.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, पक्षाची धोरणे, मूल्ये ही सर्वात आधी कार्यकारिणीमध्ये रुजविणे आवश्यक आहे. हीच मूल्ये शेवटच्या मतदारांपर्यंत पोहचविण्याची सर्वात मोठी जबाबदारी कार्यकारिणीवर असते. एकदा ही मूल्ये आणि धोरणे शेवटच्या मतदारापर्यंत पोचविली की, तो मतदार शेवटपर्यंत पक्षाशी जोडला जातो, असा मतदार जोडणे हेच सध्याच्या कार्यकारिणीचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मंगोडीकर यांनी, तर आभार अजय पाताडे यांनी मानले.


---

# बांधकाम व्यावसायिकांवर आयकरचे छापे!

## पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ : पिंपरी, किवळे, वाकडमध्ये कारवाई; अधिकृत माहिती नाही

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयकर विभागाने पिंपरी-चिंचवडमधील तीन बड्या बांधकाम व्यावसायिकांच्या घरावर आणि कार्यालयावर गुरुवारी (दि. 23) छापे मारले. ही कारवाई अजूनही सुरु असून नेमकी कोणत्या प्रकरणात कारवाई सुरु आहे, याची अधिकृत माहिती अद्याप समजू शकली नाही.**







पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी येथे रहाणा-या एका बांधकाम व्यावसायिकाच्या घरी गुरुवारी सकाळी आयकर विभागाची वाहने दाखल झाली. अधिकाऱ्यांनी घराची झडती घेत तपासाला सुरुवात केली. दरम्यान, त्याच वेळी त्या बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयात देखील आयकर विभागाचे पथक दाखल झाले. घरासह कार्यालयात देखील आयकर विभागाची कारवाई सुरु आहे.

त्याचबरोबर आयकर विभागाने गुरुवारी वाकड आणि किवळे येथील बांधकाम व्यावसायिकांवर देखील कारवाई केली आहे. यामध्ये आयकर विभाग कोणत्या प्रकरणाची चौकशी करत आहे, याबाबत अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

### बांधकाम व्यावसायिकांच्या भुवया उंचावल्या...

शहरात एकाच दिवशी तीन बांधकाम व्यावसायिकांवर आयकर विभागाने कारवाई केल्याने अनेक बांधकाम व्यावसायिकांच्या भुवया उंचावल्या आहेत. कारवाईचे लोन आपल्यापर्यंत कधी येईल हे सांगता येत नाही, अशी चर्चा बांधकाम व्यावसायिकांसह बड्या उद्योजकांच्या मध्ये सुरु आहे.

---

# थेरगावमध्ये बालविवाह उघडकीस; पती, भटजीसह दहा जणांविरोधात गुन्हा



। पिंपरी।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

थेरगाव येथे बारावर्षीय मुलीचा विवाह झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पती, मुलीचे वडील, भटजीसह दहा जणांविरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अल्पवयीन मुलीच्या २० वर्षीय भावाने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार मुलीचे वडील, पती, त्याचे वडील, बहीण, दाजी अशा दहा जणांविरोधात बालविवाह प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार मावळमध्ये राहतात. त्यांना बारा वर्षांची बहीण आहे. तिचे सोलापूर जिल्ह्यातील तरुणासोबत लग्न लावून देण्यात आले. मुलीच्या वडिलांच्या सहमतीने हे लग्न झाले. थेरगाव येथे १५ नोव्हेंबर रोजी हा विवाह सोहळा पार पडला. तक्रारदाराच्या वडिलांनी लग्नाबाबत कोणाला सांगू नको असे धमकाविले होते. घाबरुन तक्रारदाराने कोणालाही काही सांगितले नव्हते. अखेरीस तक्रारदाराने मंगळवारी आईला सांगितले. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली.

# महाराष्ट्र अस्थिर करण्याचे प्रयत्न




**महाराष्ट्र हे संत परंपरेचा वारसा सांगणारा राज्य आहे. या भूमीत संत चोखामेळा, संत ज्ञानेश्वर, संत सावता माळी, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा व संत सेवालाल महाराज इ. विविध जाती-धर्मातील, पंथातील संतांनी विषमतामूलक समाजरचनेवर वेळोवेळी आपल्या अभंगातून प्रहार केला.**

महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्यही मानले जाते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रुढीवादी, अंधश्रद्धाळू, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजात आपल्या विचारांच्या माध्यमातून नवचैतन्य निर्माण केले. महाराष्ट्र हा देशामध्ये सुधारणेबाबत नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. शांतता, बंधुभाव, स्वातंत्र्य व समता प्रदान करणारा राज्य म्हणून ओळख पावलेल्या या महाराष्ट्रात आज नेमकं चाललंय तरी काय, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे. महाराष्ट्रामध्ये २०१४ ला सत्ताबदल घडून आला. त्यानंतर अनेक स्थित्यंतर झाले. मग ते राजकीयदृष्ट्या असेल, सामाजिकदृष्ट्या असेल, आर्थिक किंवा शैक्षणिक दृष्टिकोनातून असेल! असे अनेक घटकांमध्ये बदल घडून आले. २०१४ चा सत्ताबदल हा राजकीय दृष्ट्या सर्वात मोठा स्थित्यंतर मानायला




काही हरकत नाही. सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला असता अधिक प्रभावीपणे समोर आलेले ‘कोपर्डी’ प्रकरण असेल.

कोल्हापूर येथील औरंगजेब आणि टिपू सुलतान यांचं कथितरीत्या उदात्तीकरण करणारे स्टेट्स ठेवल्यामुळे झालेला गोंधळ असेल किंवा नांदेडमध्ये दलित समाजातील तरुणाची हत्या असेल इ. अनेक घटना घडल्या व आणखी रोज कुठे ना कुठे घडत आहेत. आज आर्थिकदृष्ट्या मागासलेला मराठा समाज म्हणून मनोज जरांगे पाटलांनी आरक्षणासाठी चालू केलेला लढा, हा अत्यंत महत्त्वाचा स्थित्यंतर मानता येऊ शकतो. शिवाय दुसरे एक स्थित्यंतर अत्यंत महत्त्वाचे आहे. ते म्हणजे, शैक्षणिकदृष्ट्या मराठा समाजाच्या उन्नतीसाठी ‘सारथी’सारखी संस्था २०१८ मध्ये स्थापन करून अनेक विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण व संशोधन कार्यासाठीदेखील शासनाकडून मुबलक खर्च करण्यात येत आहे. तसेच मराठा- कुणबी प्रवर्गातील अनेक विद्यार्थी सारथी व महाज्योती अशा दोन्हीही संस्थेचा फायदा घेत असल्याचादेखील सातत्याने आरोप होत असतो. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संस्थांमध्ये भरमसाठ फी असल्याचा आरोप होत असतो. परंतु या संस्थाही याच समाजातील प्रस्थापित लोकांच्या हाती आहेत. आपल्याच समाज बांधवांनी शिकून पुढे जावे यासाठी या प्रस्थापित वर्गाकडून कोणतीही सवलत देण्यात येत नाही. या संघर्षाचा स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या २२ मार्च १९८२ च्या आंदोलनापासून ते आज मनोज जरांगे पाटीलपर्यंतचा प्रवास दिसून येतो. मराठा समाजाच्या आरक्षणासाठीची खरी लढाई ही कोपर्डीच्या बलात्कार प्रकरणानंतर सुरू झाली. याचाच परिणाम असा झाला की, मराठा समाजाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शांततेच्या मार्गाने एकूण ५८ मोर्चे काढले. यामध्ये प्रामुख्याने बलात्कारी तरुणाला फाशीची शिक्षा व्हावी ही मागणी होती. या घटनेनंतर त्याचे स्वरूप बदलून राजकीय झाले. त्यातून आरक्षणाच्या मुद्द्याने तोंड वर काढले. सध्याच्या परिस्थितीत मराठा समाज ओबीसींमधून ‘कुणबी प्रमाणपत्रा’ची मागणी करत आहे; तर दुसरीकडे सकल ओबीसी समाजामधून यास तीव्र विरोधदेखील केला जात आहे. याशिवाय महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी धनगर, बंजारा व आदिवासी समाजांचेदेखील आमरण उपोषण सुरू आहे. धनगर व बंजारा समाजाचा आदिवासी समुदायांमध्ये समावेश करावा म्हणून लढाई सुरू आहे; तर आदिवासी समाज इतरांना वाटेकरी होऊ देणार नाही अशी भूमिका घेऊन आंदोलन करत आहे. मराठा समाज हा पूर्वापार प्रस्थापित (मुबलक शेती) समाज. मात्र उत्तरोत्तर ही परिस्थिती बदलल्याचेही चित्र दिसून येते. गावगाड्यांमध्ये, खेड्यांमध्ये, गावकुसाबाहेर व डोंगरदऱ्यांमध्ये राहणाऱ्या भटके-विमुक्तांसह ओबीसी समुदायांना अशी भीती आहे की, हा प्रस्थापित मराठा समाज ओबीसींमध्ये आल्यास या समाजांना राजकीयदृष्ट्या बेदखल केले जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थेत यांना निवडणूक लढण्यासाठी अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागेल.

## संपादकीय »

### पदोन्नतीचे पाहा..

***क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ भारतास किरकोळीत धूळ चारत असताना त्या ऐतिहासिक क्षणी पंतप्रधान तेथे उपस्थित होते.***

आपले कडवे टीकाकार प्रतिस्पर्धी निवडून यावेत यासाठी जातीने लक्ष घालणारे खरे लोकशाहीवादी पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या पणतूने एखाद्याचे वर्णन ‘पनवती’ असे करावे यातून केवळ मूर्खपणाचे दर्शन होते असे नाही, भारतीय संघ जिंकला असता तर साहजिकच कोणत्याही चतुर राजकारण्याप्रमाणे त्या विजयाचा परावर्तित प्रकाश त्यांच्याही चेहऱ्यावर पडावा असे प्रयत्न झाले असते आणि भक्तगणांनी त्यांच्यामुळे आपण जिंकलो इतक्या बिनडोकपणे युक्तिवाद केले असते. याच परिस्थितीचा व्यत्यास आपण पराभूत झाल्यामुळे समोर आला. आणि विजयीवीरांचे कौतुक करण्याच्या उदात्त हेतूने मैदानस्थळी योग्य वेळी हजर झालेल्या पंतप्रधानांवर भारतीय खेळाडूंचे सांत्वन करण्याची वेळ आली. तेव्हा विजयाचे राजकारण झाले असते हे जर खरे असेल तर पराजयाचेही राजकारण केले जाणार हेही तितकेच खरे.

**कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी ‘ओपनएआय’मध्ये गेल्या चार दिवसांत जे काही घडले त्याचा तर्क लावणे ‘चॅटजीपीटी’लाही जमणार नाही. या घडामोडींची सुरुवात झाली कंपनीचे सीईओ सॅम अल्टमन यांच्या हकालपट्टीने. ‘ओपनएआय’ या ‘ना नफा’ कंपनीला लागणारा निधी पुरवणाऱ्या गुंतवणूकादारांना खेचून आणणाऱ्या अल्टमन यांची अचानक झालेली उचलबांगडी खळबळ उडवणारी ठरली.**

## अल्टमन गेले, अल्टमन आले...!

पाठोपाठ कंपनीचे अध्यक्ष ग्रेग ब्रोकमन हेही पायउतार झाले. त्यावरून तर्कवितर्क लढवले जात असतानाच या कंपनीचे सर्वात मोठे गुंतवणूकदार असलेल्या ‘मायक्रोसॉफ्ट’ने नव्या कृत्रिम प्रज्ञा विभागाची स्थापना करत त्यात या दोघांना सामावून घेतले. या हालचालींनी भुवया उंचावल्या असताना ‘ओपनएआय’मधील ७५०पैकी ५०० कर्मचाऱ्यांनी अल्टमन यांना हटवणाऱ्या संचालक मंडळालाच बडतर्फ करण्यासाठी राजीनाम्याची धमकी दिली. हे नेमके काय सुरू आहे, याबद्दल गोंधळ उडाला असतानाच बुधवारी सॅम अल्टमन आणि ग्रेग ब्रोकमन यांना ओपनएआयमध्ये पुन्हा घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. एवढेच नव्हे तर, कंपनीच्या संचालक मंडळात मोठे फेरबदल करण्यास सुरुवात झाली असून अल्टमन, ब्रोकमनसह मायक्रोसॉफ्ट कंपनीलाही संचालक मंडळात स्थान देण्याचे ठरले आहे. कॉर्पोरेट जगतातील ‘बोर्ड रूम’मधील




अशा उलथापालथींकडे बाहेरील जगात मनोरंजन म्हणून पाहणे ठीक. पण ‘ओपनएआय’चे तसे नाही. ही कंपनी कृत्रिम प्रज्ञेच्या (आर्टिफिशियल इंटिलिजन्स-एआय) क्षेत्रातील सर्वात प्रगत कंपनी. चॅटजीपीटी हे चॅटबोट तंत्रज्ञान विकसित करून ‘ओपनएआय’ने ‘एआय’च्या विलक्षण क्षमतेची चुणूक जगाला दाखवली. अशा कंपनीत चार-पाच दिवसांत तीन वेळा सीईओ बदल होणे, अध्यक्ष हटवण्यात येणे, संचालक मंडळाला बाहेरचा रस्ता दाखवणे आणि कर्मचाऱ्यांनी थेट राजीनाम्याची धमकी देणे अशा घटना घडणे गंभीर आहे. त्यामुळे या घडामोडींच्या आधीच्या आणि नंतरच्या परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक ठरते. ‘ओपनएआय’ ही मूळात ‘ना-नफा’ तत्वावर स्थापन झालेली कंपनी. अल्टमन यांच्यासह ‘एआय’ संशोधक इलया सट्स्कीव्हर आणि अब्जाधीश उद्योगपती इलॉन मस्क या संस्थापकांनी कृत्रिम प्रज्ञा संशोधनासाठी तिची स्थापना केली. ८६ अब्ज डॉलर इतके विद्यमान मूल्य असलेल्या या कंपनीत मायक्रोसॉफ्टचा ४९ टक्के हिस्सा आहे. तरीही कंपनीच्या संचालक मंडळात मायक्रोसॉफ्टला स्थान नव्हते. ‘ओपनएआय’ कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रात संशोधनाच्या टप्प्यावर होती तोपर्यंत हे चालणारे होते. मात्र, ‘चॅटजीपीटी’च्या निर्मितीनंतर समीकरणे बदलू लागली. ‘चॅटजीपीटी’ यशस्वी झाल्यानंतर ‘ओपनएआय’कडे गुंतवणूदारांचा ओढा वाढू लागला. त्याचवेळी या संशोधनातून अर्थार्जन करण्याचा मार्गही अल्टमन यांच्यासह काहींना दिसू लागला. आता वेळ न दवडता हे तंत्रज्ञान व्यापारासाठी उपलब्ध व्हायला हवे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# व्हॉट्सॲपवरची ब्लू टिक दाखवा!

## सुनावणी संपल्यानंतर शिंदे गटाची मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या १६ आमदार अपात्रप्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दरबारी आहे. आज (२३ नोव्हेंबर) ठाकरे गटाकडून युक्तीवाद केला गेला. आजची सुनावणी संपली असून आता पुढची सुनावणी सोमवारी होणार असल्याची माहिती शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी दिली. तसंच, यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांच्यावरही आरोप केले.**



बहुमत चाचणीवेळी ठाकरे गटाने शिंदे गटातील आमदारांना व्हीप बजावला होता. परंतु, हा व्हीप धुडकावून शिंदे गटाच्या बाजूने मतदान केलं, हा मुद्दा उचलून ठाकरे गटाने युक्तीवाद केला होता. यावरून आज राहुल नार्वेकरांनी प्रश्न विचारले असता सुनील प्रभू यांना उत्तरे देता आली नसल्याचा दावा संजय शिरसाटांनी केला आहे. संजय शिरसाट म्हणाले की, व्हीप बजावण्याच्या बैठकीला दादा भुसे, संजय राठोड उपस्थित नव्हते. हे स्टेटमेंट सुनील प्रभूंनी दिलं आहे. त्यांचे स्टेटमेंट्स गोंधळात टाकणारे आहेत. प्रश्न विचारल्यानंतर त्यांना अनुसरून उत्तरं न देता किंवा उत्तरांची व्याप्ती वाढवण्याचा केविलवाणा प्रयत्न सुनील प्रभूंकडून झाला. “व्हीप बजावण्याचा प्रकार होता, त्याबद्दल जो खुलासा केला तो मला समाधानकारक वाटला नाही. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सह्या घेतल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, आम्ही त्यांना मेल, व्हॉट्स ॲपवर व्हीपबाबत सांगितल्याचं त्यांनी सांगितलं. पण याचा पुरावा त्यांनी दिला नाही. त्यामुळे ही सुनावणी आता सोमवारी ठेवण्यात आली आहे. त्यांच्यातर्फेच दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला जातोय”, असंही ते म्हणाले. “ठाकरे गटाने बनावट कागदपत्रे तयार केल्याने उत्तरे देताना अडचणी येत आहेत. प्रश्नांची थोडक्यात आणि समर्पक उत्तरे द्या असं जेठमलानी यांनीही त्यांना बजावलं. परंतु, त्यांच्याकडून उत्तरे लांबवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दोन-तीन वेळा ब्रेक घेण्याचाही प्रयत्न केला”, असाही आरोप त्यांनी केला. “व्हीपच्या आधारावर त्यांनी अपात्रतेची मागणी केली होती. मात्र तो व्हीप बनावट आहे. तो व्हीप कोणापर्यंत पोहोचलाच नाही. त्या १६ आमदारांमध्ये मी आहे. परंतु, माझ्यापर्यंत व्हीप पोहोचलाच नव्हता. हे आम्ही सर्वोच्च न्यायालयातही सांगितलं होतं. परंतु, याचा खुलासा करताना ठाकरे गटाची दमछाक होत आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्याला जबाबदार धरून त्यांना ते खोटे पुरावे सादर करत होते हे आज उघडकीस आलं आहे”, असंही ते म्हणाले. “व्हॉट्स ॲपवर व्हीप पाठवला असेल तर मेसेज

### गोंधळात टाकणारे स्टेटमेंट्स

» बहुमत चाचणीवेळी ठाकरे गटाने शिंदे गटातील आमदारांना व्हीप बजावला होता. परंतु, हा व्हीप धुडकावून शिंदे गटाच्या बाजूने मतदान केलं, हा मुद्दा उचलून ठाकरे गटाने युक्तीवाद केला होता. यावरून आज राहुल नार्वेकरांनी प्रश्न विचारले असता सुनील प्रभू यांना उत्तरे देता आली नसल्याचा दावा संजय शिरसाटांनी केला आहे. संजय शिरसाट म्हणाले की, व्हीप बजावण्याच्या बैठकीला दादा भुसे, संजय राठोड उपस्थित नव्हते. हे स्टेटमेंट सुनील प्रभूंनी दिलं आहे. त्यांचे स्टेटमेंट्स गोंधळात टाकणारे आहेत. प्रश्न विचारल्यानंतर त्यांना अनुसरून उत्तरं न देता किंवा उत्तरांची व्याप्ती वाढवण्याचा केविलवाणा प्रयत्न सुनील प्रभूंकडून झाला. “व्हीप बजावण्याचा प्रकार होता, त्याबद्दल जो खुलासा केला तो मला समाधानकारक वाटला नाही. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सह्या घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

# सुषमा अंधारेंनी मनोज जरांगे-पाटलांना खडसावलं!

## जरांगे-पाटलांनी जीव धोक्यात घालून आंदोलने केली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यावरून शिवसेना ( ठाकरे गट ) उपनेत्या, सुषमा अंधारे यांनी जरांगे-पाटलांना खडसावलं आहे. “जरांगे-पाटलांची भूमिका पाहून त्यांचं आरक्षणावरील लक्ष्य विचलित होत असल्याचं दिसत आहे. व्यक्तिगत टीका-टिप्पणी करणं त्यांना शोभत नाही,” अशा शब्दांत सुषमा अंधारेंनी जरांगे-पाटलांना सुनावलं आहे.**





सुषमा अंधारे म्हणाल्या, “जरांगे-पाटील हे सुरूवातीला आरक्षणासाठी लढत असल्याचं निश्चित वाटत होतं. पण, अलीकडे त्यांची भूमिका पाहून आरक्षणावरील लक्ष्य विचलित झाल्याचं वाटत आहे. त्यांनी व्यक्तिगत टीका-टिप्पणी करणं शोभत नाही. एकीकडे मागास सांगायचं आणि जरांगे आडनावाबरोबर पाटील लावायचं. आर्थिक मागास असल्याचं बोलायचं आणि दुसरीकडे १०० जेसीबीने फुलांची उधळण करायची. आमच्याकडे काहीच नाही बोलायचं आणि सभेसाठी १५० एकर मोसंबीची बाग तोडायची,” असं म्हणत सुषमा अंधारेंनी टीका केली आहे. “ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. यातून केंद्र सरकारच मार्ग काढू शकते. विधिमंडळाने एक ठराव पास करून केंद्र सरकारकडे पाठवावा. केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवून मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा,” अशी मागणी अंधारेंनी केली आहे. “पण, केंद्र आणि राज्यातील भाजपा भांडण लावण्याचं काम करत आहे. कारण, महिला सुरक्षा, आरोग्यव्यवस्था, कायदा सुव्यवस्था, कंत्राटी भर्ती, बेरोजगारी, दुष्काळी परिस्थितीबाबत भाजपा अपयशी ठरली आहे. भाजपाने सगळे मुद्दे विचलित करून फक्त आरक्षणाच्या मुद्दा चर्चेत आणला आहे. भाजपाला आरक्षण द्यायचं नाही. फक्त जाती-जातींमध्ये भांडण लावायचं आहे,” असा आरोप सुषमा अंधारेंनी केला आहे. जरांगे-पाटलांचा बोलविता धनी कुणी आहे का? असा प्रश्न विचारल्यावर सुषमा अंधारे म्हणाल्या, “जरांगे-पाटलांनी जीव धोक्यात घालून आंदोलने केली आहेत. त्यामुळे जरांगे-पाटील कुणाचं ऐकून बोलत असतील, असं वाटत नाही. पण, समोरील गर्दी पाहून एखाद्याची मनस्थिती बदलू शकते. तेव्हा अशी विधान येऊ शकतात.गेल्या काही दिवसांपासून मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यावरून शिवसेना उपनेत्या, सुषमा अंधारे यांनी जरांगे-पाटलांना खडसावलं आहे. “जरांगे-पाटलांची भूमिका पाहून त्यांचं आरक्षणावरील लक्ष्य विचलित होत असल्याचं दिसत आहे.

### 150 एकर मोसंबीची बाग तोडायची ?

» एकीकडे मागास सांगायचं आणि जरांगे आडनावाबरोबर पाटील लावायचं. आर्थिक मागास असल्याचं बोलायचं आणि दुसरीकडे १०० जेसीबीने फुलांची उधळण करायची. आमच्याकडे काहीच नाही बोलायचं आणि सभेसाठी १५० एकर मोसंबीची बाग तोडायची,” असं म्हणत सुषमा अंधारेंनी टीका केली आहे. “ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. यातून केंद्र सरकारच मार्ग काढू शकते. विधिमंडळाने एक ठराव पास करून केंद्र सरकारकडे पाठवावा. केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवून मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा,” अशी मागणी अंधारेंनी केली आहे. “पण, केंद्र आणि राज्यातील भाजपा भांडण लावण्याचं काम करत आहे.

# पनौतीच्या वक्तव्यावर राहुल गांधींना धक्का

## » दोन दिवसात द्यावं लागणार उत्तर: निवडणूक आयोग

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांना निवडणूक आयोगाकडून (ELECTION COMMISSION) नोटीस बजावण्यात आलीये. पंतप्रधान नरेंद्र मोदी (NARENDRA MODI) यांचा पनौती म्हणून राहुल गांधींनी उल्लेख केला होता. त्याच पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान राहुल गांधी यांना 25 नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच पुढील दोन दिवसांत या नोटीशीला उत्तर द्यावं लागणार आहे.



राजस्थानमधील एका प्रचारसभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला होता. दरम्यान राहुल गांधी यांच्या वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आलं. तसेच भाजपकडूनही राहुल गांधी यांना प्रत्युत्तर देण्यात येत होतं. आता निवडणूक आयोगाकडूनही कारवाईची भूमिका घेण्यात आलीये. यावर राहुल गांधी काय उत्तर देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. पंतप्रधान मोदी म्हणजे पनौती मोदी आहेत, भारतीय टीम चांगलं खेळत होती, पण हे पनौती तिकडे गेले आणि आपल्या टीमला हरवलं अशी जळजळीत टीका काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी केली होती. ते राजस्थानमधील एका प्रचारसभेत बोलत होते. कत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट्सने हरवलं. पूर्ण स्पर्धेत चांगली कामगिरी करूनसुद्धा अंतिम सामन्यात भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेला सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः उपस्थित होते. त्यानंतर आता त्यांच्यावर राहुल गांधी यांनी टीका केली. राहुल गांधी म्हणाले की, पीएम मोदी म्हणजे पनौती मोदी, ते सामना पाहायला गेले आणि भारतीय संघ हरला. आपला संघ चांगली कामगिरी करत होता, पण पनौती तिकडे गेले आणि भारतीय संघाला हरवलं. राहुल गांधींच्या या टीकेला भाजपकडून देखील उत्तर देण्यात आलं होतं. तसेच आता निवडणूक आयोगाच्या नोटीशीवर काँग्रेसकडून काय प्रतिक्रिया येणार हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरेल. पनवती आणि पाकिट चोर अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना केल्याने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना निवडणूक आयोगाने गुरुवारी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राजस्थानमधील एका निवडणूक रॅलीत गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केलं होतं. याबाबत भाजपाने निवडणूक आयोगात धाव घेतली होती. भाजपाच्या तक्रारीची निवडणूक आयोगाने दखल घेतली असून कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राहुल गांधींनी पंतप्रधानांची तुलना पाकिटमारशी केली. तसंच, पीएम म्हणजे पनवती मोदी अशीही खिल्ली राहुल गांधींनी उडवली होती. पंतप्रधानांनी गेल्या नऊ वर्षांत श्रीमंतांचे १४ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याचा आरोपही त्यांनी केला.

### पनवती शब्द निषेधार्ह आहे

» निवडणूक आयोगाच्या सूचनेमध्ये MCC तरतुदीचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की "असत्यापित आरोप किंवा विकृती" वर आधारित टीका टाळली पाहिजे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ नुसार "पनवती" चा वापर भ्रष्ट व्यवहाराच्या व्याख्येत येतो. तशीच ही अध्यात्मिक निंदा आहे. कोणत्याही व्यक्तिला पाकिटमार म्हणणे म्हणजे हा केवळ वैयक्तिक हल्लाच नाही तर त्या व्यक्तीचे चारित्र्यहनन करणे होय. तसंच, पनवती शब्द निषेधार्ह आहे. मॅच हरणं किंवा जिंकणं हे व्यक्तीच्या हातात नसून संघाच्या कामगिरीवर अवलंबून असतं. तसंच, पंतप्रधानांनी ५० हजार कोटी रुपयांची कर्जमाफीही केलेली नाही. सर्व बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली काम करतात. आरबीआय ही एक वैधानिक स्वायत्त संस्था आहे, असं भाजपाने निवडणूक आयोगात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं होतं. मोदी आडनावप्रकरणी झालेल्या कारवाईमुळे राहुल गांधींना खासदारकी गमवावी लागली होती.

# रतन टाटांचा वारसदार ठरला?

## » दोन मुली सांभाळणार कोट्यावधींचं साम्राज्य

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

टाटा समूह (TATA GROUP) हा देशातील सर्वात मोठा समूह आहे. रतन टाटा (RATAN TATA) हे या समुहाचे प्रमुख आहेत. आता त्यांच्यानंतर कोण टाटा ग्रुपचा प्रमुख कोण असेल? एवढं मोठं व्यापारी साम्राज्य कोण सांभाळणार? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर खुद्द रतन टाटा यांनी शोधून काढले आहे. कारण त्यांनी टाटा समुहाच्या वारसदारांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. येत्या काळात हे वारस संपूर्ण टाटा ग्रुपचा भार सांभाळतील. विशेष म्हणजे या वारसदार दोन्ही मुली असून, त्यांचे वय 40 वर्षेही नाही.



रतन टाटा यांचा धाकटा भाऊ नोएल टाटा यांच्या मुली या टाटा ग्रुपच्या वासरदार होण्याची शक्यता आहे. लीह, माया या दोन मुली आणि नेविल टाटा हा मुलगा आहे. हे दिघेही मीडियाच्या लाइमलाइटपासून दूर राहतात. तसेच, रतन टाटा यांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करत आहेत. जेणेकरुन त्या भविष्यात कोट्यवधी रुपयांचे व्यवसाय साम्राज्य हाताळू शकतील. नेविल टाटा यांची मोठी मुलगी लीह टाटा हॉटेल उद्योगाचा व्यवसाय सांभाळत आहे. ताज हॉटेल्स रिसॉर्ट्स अँड पॅलेसेसमध्ये असिस्टंट सेल्स मॅनेजर म्हणून त्यांनी करिअरला सुरुवात केली. माद्रिदमधील IE बिझनेस स्कूलमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर, लेहला विक्री विभागात कामाचा अनुभव मिळाला. त्यानंतर, तिने इंडियन हॉटेल कंपनीकडे, टाटा ग्रुप ऑफ हॉटेल्सचे प्रमुख युनिट, व्यवस्थापन आणि ऑपरेशन्स हाताळली. लिया टाटा यांची धाकटी बहीण माया टाटा हिने रतन टाटा यांच्या मार्गदर्शनाखाली टाटा अपॉर्च्युनिटीज फंडातून आपल्या करिअरची सुरुवात केली. त्यांनी येथे पोर्टफोलिओ व्यवस्थापक आणि गुंतवणूकदार संबंध प्रतिनिधी म्हणून काम केले. युनिव्हर्सिटी ऑफ वॉरविक आणि बेज बिझनेस स्कूलच्या पदवीधर, माया यांनी टाटा समूहातील अनेक भूमिकांमध्ये योगदान दिले आहे. त्यांनी अलीकडेच टाटा कॅपिटलमधील त्यांचा कार्यकाळ संपवला आणि त्यांचे लक्ष टाटा डिजिटलकडे हस्तांतरित केले. नोएल टाटा यांचा धाकटा मुलगा नेविल टाटा हा बेज बिझनेस स्कूलचा पदवीधर आहे. डीएनए रिपोर्टमधून मिळालेल्या माहितीनुसार, तो सध्या ट्रेंट हायपरमार्केट प्रायव्हेट लिमिटेडचे प्रमुख पद सांभाळत आहे.

# उत्तरकाशीमध्ये रेस्क्यू ऑपरेशन अंतिम टप्प्यात

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

उत्तराखंडच्या उत्तर काशीमध्ये 41 जणांना वाचवण्यासाठी सुरू असलेलं रेस्क्यू ऑपरेशन आता अंतिम टप्प्यात आला आहे. मात्र, बोगदा खोदणाऱ्या अमेरिकन ऑगर मशीनमध्ये बिघाड झाल्याची माहिती समोर येत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी दिल्लीहून हेलिकॉप्टरद्वारे 7 तज्ज्ञांना पाचारण करण्यात आलं आहे. काही तांत्रिक बिघाड दूर करुन कोणत्याही परिस्थिती आजच बचावकार्य पूर्ण केलं जाईल, आज कोणत्याही क्षणी उत्तराखंडच्या उत्तर काशी येथील निर्माणधीन बोगद्यात अडकलेल्या मजुरांची सुटका होऊ शकते, असं सांगितलं जात आहे. बोगद्यात अडकलेले मजूर बाहेर येताच, सर्वात आधी त्यांची वैद्यकीय तपासणी केली जाईल. त्यानंतर उर्वरित प्रक्रिया केली जाईल. याच पार्श्वभूमीवर रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली असून डॉक्टरांना घटनास्थळी पाचारण करण्यात आलं आहे. उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात निर्माणाधीन सिल्क्यारा बोगद्यात अडकलेल्या 41 कामगारांना वाचवण्यासाठी विविध यंत्रणांचे काम बुधवारी अंतिम टप्प्यात पोहोचलं. अडकलेल्या कामगारांपासून प्रशासन काहीच अंतर दूर आहे. बचाव कर्मचाऱ्यांनी ढिगाऱ्यांमध्ये 45 मीटर रुंद पाईप यशस्वीरित्या टाकले आहेत. आता फक्त काही मीटरचे आच्छादन उरलं आहे. त्यानंतर बचाव पथक बोगद्यात अडकलेल्या कामगारांपर्यंत पोहोचतील आणि त्यांना पाईपद्वारे बाहेर काढतील. कामगारांपर्यंत पोहोचण्यासाठी बचाव कर्मचाऱ्यांना एकूण 57 मीटर ड्रिल करावं लागेल. ढिगाऱ्यात 39 मीटरपर्यंत स्टीलचे पाईप टाकण्यात आले आहेत.

# अभिनेता प्रकाश राज यांना ईडीचं समन्स

अभिनेता प्रकाश राज (PRAKASH RAJ) यांना प्रणव ज्वेलर्स मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ENFORCEMENT DIRECTORATE) समन्स बजावले आहे. पॉन्झी स्कीम घोटाळ्याप्रकरणी ईडीने तामिळनाडूतील त्रिची येथील प्रसिद्ध प्रणव ज्वेलर्सवर छापा टाकला होता. प्रकाश राज हे प्रणव ज्वेलर्सची जाहिरात करतात. छापेमारीनंतर तपास यंत्रणेने आता प्रकाश राज यांना नोटीस पाठवली आहे. तामिळनाडूच्या त्रिची येथील प्रसिद्ध प्रणव ज्वेलर्समध्ये PMLA अंतर्गत शोध मोहिमेदरम्यान अशी अनेक कागदपत्रे सापडली ज्यामध्ये सुमारे 23 लाख 70 हजार रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांची माहिती आढळली. एवढेच नाही तर ईडीने झडतीदरम्यान 11 किलो 60 ग्रॅम सोन्याचे दागिनेही जप्त केले.

प्रणव ज्वेलर्सच्या लोकांनी अनेक शेल कंपन्यांच्या माध्यमातून सोने योजनेतून जनतेकडून गोळा केलेले 100 कोटी रुपये गुंतवल्याचे तपास यंत्रणेकडून सांगण्यात आले. ईडीच्या म्हणण्यानुसार, तपासादरम्यान असे आढळून आले की प्रणव ज्वेलर्स आणि त्याच्याशी संबंधित लोकांनी फसवणूक करून घेतलेले पैसे दुसऱ्या शेल कंपनीकडे वळवले होते. प्रकाश राज हे प्रणव ज्वेलर्सची जाहिरात करतात, त्यामुळे आता या प्रकरणी प्रकाश राज यांची देखील चौकशी केली जाणार आहे.



बुधवारी जारी केलेल्या निवेदनात, ईडीने म्हटले की, "तपासात असे दिसून आले आहे की प्रणव ज्वेलर्स आणि इतर संबंधित व्यक्तींनी सराफा/सोन्याचे दागिने खरेदी करण्याच्या नावाखाली सार्वजनिक निधी बनावट संस्था/ॲक्सेस प्रदात्यांकडे हस्तांतरित करून जनतेची फसवणूक केली आहे." त्रिचीस्थित प्रणव ज्वेलर्सने उच्च परतावा देण्याचे आश्वासन देऊन सोने गुंतवणूक योजनेच्या नावाखाली जनतेकडून 100 कोटी रुपये गोळा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रकाश राज हे अनेकवेळा त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे चर्चेत असतात. प्रकाश यांनी बॉलिवूडसोबतच साऊथ चित्रपटसृष्टीमध्ये देखील विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांनी केजीएफ, वॉन्टेड,वारिसू यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केलं. सिंघम या चित्रपटामुळे त्यांना विशेष लोकप्रियता मिळाली.

## दोन सुपरस्टार एकाच फ्रेममध्ये!

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते कमल हासन (KAMAL HAASAN) आणि अभिनेते रजनीकांत (RAJINIKANTH) यांचा चहता वर्ग मोठा आहे. रजनीकांत आणि कमल हासन यांनी साऊथ चित्रपटसृष्टीसोबतच बॉलिवूडमध्ये देखील विशेष लोकप्रियता मिळवली आहे. नुकतेच कमल हासन आणि रजनीकांत यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. रजनीकांत आणि कमल हासन यांनी 21 वर्षांनंतर एकाच स्टुडिओमध्ये शूटिंग केले आहे. लायका प्रॉडक्शन या ट्विटर अकाऊंटवरुन कमल हासन आणि रजनीकांत यांचे फोटो शेअर करण्यात आले आहेत. या फोटोला कॅप्शन देण्यात आले, "कमल हासन आणि रजनीकांत यांनी 21 वर्षांनंतर एकाच स्टुडिओमध्ये त्यांच्या इंडियन-2 आणि थलाइवर 170 या चित्रपटांचे शूटिंग केले." लायका प्रॉडक्शनच्या ट्विटर अकाऊंटवरुन शेअर करण्यात आलेल्या कमल हासन आणि रजनीकांत यांच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

## 'आंख मारे' या गाण्यावर डान्स



मध्य प्रदेशातील दमोह विधानसभा मतदारसंघातील आम आदमी पार्टीच्या महिला उमेदवार आणि अभिनेत्री चाहत पांडे (CHAHAT PANDEY) या सध्या चर्चेत आहेत. चाहत यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये चाहत या 'सिम्बा' चित्रपटातील 'आंख मारे' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. मध्य प्रदेशातील दमोह विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाच्या (आप) महिला उमेदवार चाहत पांडे यांच्या व्हायरल झालेल्या एक मिनिट सहा सेकंदाच्या व्हिडीओमध्ये त्या डान्स करताना दिसत आहे. मात्र, हा व्हिडीओ कधीचा आहे? ही माहिती अजून समोर आलेली नाही. चाहत पांडे यांच्या डान्सच्या व्हिडीओवर अनेक लोकांनी कमेंट्स केल्या आहेत. काही लोकांनी या व्हिडीओला कमेंट करुन चाहत पांडे यांना ट्रोल देखील केलं आहे. 'हे बघा, आम आदमी पार्टीचे विधानसभेच्या उमेदवार, ज्यांना आमदार होऊन जनतेची सेवा करायची आहे. हे त्यांचे खरे रूप आहे का?", असं म्हणत काही नेटकऱ्यांनी चाहत पांडे यांना ट्रोल केलं. काही नेटकऱ्यांचे म्हणणे आहे की, राजकारणात येण्यापूर्वी चाहत पांडे या छोट्या पडद्यावरील अभिनेत्री होत्या, मग त्यांनी डान्स करण्यात काय हरकत आहे? तर काही लोक, "हे योग्य नाही." असं म्हणत आहेत. चाहत पांडे यांनी काही मलिकांमध्ये काम केलं. त्यांनी वयाच्या 17 व्या वर्षी पवित्र बंधन या टीव्ही शोमधून आपल्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीला सुरुवात केली. तेनालीरामन, राधा कृष्णन, सावध इंडिया, नागिन-2, दुर्गा-माता की छाया, अलादीन आणि क्राइम पेट्रोल या मालिकांमध्ये देखील त्यांनी काम केलं. सध्या त्या 'नाथ जेवर या जंजीर' या टीव्ही शोमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या मालिकेत त्या महुआ ही भूमिका साकारत आहे. मध्य प्रदेशातील दमोह येथे राहणाऱ्या चाहत पांडे या जून महिन्यामध्ये आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश केला होता. भाजपने ज्येष्ठ नेते जयंत मलाय्या यांच्या विरोधात दमोहमधून चाहत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्याचवेळी काँग्रेसचे विद्यमान आमदार अजय टंडन यांचाही या लढतीत सहभाग आहे.

## ॲनिमल अंगावर शहारे आणणारा !

अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) हा त्याच्या चाहत्यांच्या वर्षाचा शेवट धमाकेदार पद्धतीनं करणार आहे. कारण रणबीरचा ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट रिलीज होत आहे. या चित्रपटाचा टीझर आणि या चित्रपटामधील अर्जन वेली हे गाणं काही दिवसांपूर्वी रिलीज झालं. टीझर आणि गाणं पाहिल्यानंतर रणबीरचे चाहते या चित्रपटाच्या ट्रेलरची उत्सुकतेने वाट बघत होते. आता ॲनिमल या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. रणबीरच्या ॲनिमल या चित्रपटामधून प्रेक्षकांना ॲक्शन, ड्रामा आणि इमोशन्सची ट्रीट मिळणार आहे,असा अंदाज ॲनिमल या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर लावला जाऊ शकतो. ट्रेलरची सुरुवात अनिल कपूर आणि रणबीर कपूर यांच्या एका सीननं होते. या सीनमध्ये रणबीर आणि अनिल यांचा जबरदस्त अभिनय बघायला मिळत आहे. ट्रेलरमध्ये दिसत आहे की अनिल कपूर हे रणबीरचे वडिल आहेत आणि वडिलांसाठी रणबीर काहीही करायला तयार असतो. ॲनिमल या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये बॉबी देओलची झलक अवघ्या काही सेकंद दिसते. पण ट्रेलरमधील बॉबीच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.



# ईशा तलवारनं सांगितलं संस्कृत भाषेचं महत्व

अभिनेत्री ईशा तलवार ही एक चर्चेतील सेलिब्रेटी आहे. ती तिच्या परखड वक्तव्यांसाठी ओळखली जाणारी अभिनेत्री नसून आता तिनं कलाकारांना संस्कृत भाषा शिकण्याचा सल्ला दिला आहे. केरळ ते तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान असे करत आता पंजाबमध्ये आली आहे. पंजाबच्या मनोरंजन विश्वात ईशाची इंट्री झाली आहे. पंजाबी मालिका चमक मध्ये झळकणार असल्याचे सांगण्यात येत आहे. ईशानं अमर उजालाला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये संस्कृत भाषेविषयी केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे. त्या वक्तव्याची दखल घेण्याचे दुसरे एक महत्वाचे कारण म्हणजे यापूर्वी कोणत्याही कलाकारानं संस्कृत भाषेवरुन वेगळ्या प्रकारे मत व्यक्त केलेलं ऐकीवात नाही. ईशाचं म्हणणं आहे की, कलाकारांना वेगवेगळ्या भाषेचं ज्ञान असणं जास्त गरजेचं आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व फारच प्रभावी होते. ते अधिक संवाद साधू शकतात. त्यांची अभिव्यक्ती वाढते. त्यांना वेगवेगळ्या प्रकारे स्वताला सादर करता येते. थोडक्यात त्यांच्या अभिनयातील सशक्तता वाढीस लागते. तुम्ही जर एकाच भाषेत संवाद साधत असाल तर तुम्हाला काही गोष्टींपासून वंचित राहावे लागते. भाषा हे अभिव्यक्त होण्याचे माध्यम आहे. पण तुम्ही जर बहुभाषिक असाल तर तुम्हाला त्याचा फायदाच होतो तोटा नाही. मला या सगळ्यात महत्वाची वाटते ती संस्कृत भाषा. ही देवभाषा आहे असे आपण म्हणतो. पण ही भाषा सगळ्या भाषांची जननी आहे हे देखील आपण लक्षात घेण्याची गरज आहे.

# जगज्जेते 'सूर्य' तेजाने होरपळले!

## शेवटच्या बॉलवर सिक्स मारून सामना जिंकला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दोन गडी राखून पराभव केला आहे. विशाखापट्टणमच्या डॉ. वाय.एस. राजशेखर स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात जोश इंग्लिसच्या झंझावाती शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने २० षटकात तीन गड्यांच्या मोबदल्यात २०८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात टीम इंडियाने सूर्यकुमार यादवच्या ८० आणि इशान किशन ५८ धावांच्या झंझावाती खेळीमुळे शेवटच्या षटकात लक्ष्याचा पाठलाग केला. मात्र, एक चेंडू शिल्लक असताना रिंकू सिंगने भारताला विजय मिळवून दिला. रिंकू १४ चेंडूत २२ धावा करून नाबाद परतला.**

भारताने १९ षटकात ५ विकेट गमावत २०२ धावा केल्या होत्या. टीम इंडियाला विजयासाठी सहा चेंडूत सात धावा करायच्या होत्या. रिंकू सिंग आणि अक्षर पटेल क्रीजवर होते. सीन ॲबॉटच्या पहिल्याच चेंडूवर रिंकूने चौकार ठोकला. यानंतर पाच चेंडूत तीन धावा हव्या होत्या. पुढच्याच चेंडूवर रिंकूने एक धाव घेतली. यानंतर अक्षर पटेल तिसऱ्या चेंडूवर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ फलंदाजीला आलेला रवी बिश्नोई चौथ्या चेंडूवर धाव घेण्याच्या प्रयत्नात धावबाद झाला. भारताला दोन चेंडूंवर दोन धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर रिंकू सिंगने लेग साईडवर शॉट खेळून धाव घेतली. एक धाव पूर्ण झाली आणि दुसऱ्या धावण्याच्या प्रयत्नात अर्शदीप सिंग धावबाद झाला. शेवटच्या चेंडूवर एक धाव आवश्यक होती. रिंकू स्ट्राइकवर होता. तो बाद झाला असता किंवा धावा करू शकला नसता, तर





सामना सुपर ओव्हरमध्ये गेला असता, पण तसे झाले नाही. सीन ॲबॉटच्या चेंडूवर रिंकूने षटकार ठोकला. दुर्दैवाने त्या सहा धावा रिंकूच्या खात्यात जमा झाले नाहीत. कारण ॲबॉटचा पाय रेषेच्या बाहेर गेला होता आणि पंचांनी तो नो-बॉल घोषित केला. अशा परिस्थितीत भारताच्या खात्यात षटकार ऐवजी एक धाव जमा झाली आणि टीम इंडियाने एक चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. रिंकू सिंगने १४ चेंडूत २२ धावा केल्यानंतर नाबाद परतला. २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाचे दोन्ही सलामीवीर १५ चेंडूतच पॅव्हेलियनमध्ये परतले. ऋतुराज गायकवाड पहिल्याच षटकात खाते न उघडता धावबाद झाला. त्याला एका चेंडूचाही सामना करता आला नाही. तिसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल पॅव्हेलियनमध्ये परतला. यशस्वीने आठ चेंडूत २१ धावा केल्या. दोन गडी बाद झाल्यानंतर इशान किशन आणि सूर्यकुमार यांनी डावाची धुरा सांभाळली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी

### 'त्या' धावा रिंकूला मिळाल्याच नाहीत

रवी बिश्नोई चौथ्या चेंडूवर धाव घेण्याच्या प्रयत्नात धावबाद झाला. भारताला दोन चेंडूंवर दोन धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर रिंकू सिंगने लेग साईडवर शॉट खेळून धाव घेतली. एक धाव पूर्ण झाली आणि दुसऱ्या धावण्याच्या प्रयत्नात अर्शदीप सिंग धावबाद झाला. शेवटच्या चेंडूवर एक धाव आवश्यक होती. रिंकू स्ट्राइकवर होता. तो बाद झाला असता किंवा धावा करू शकला नसता, तर सामना सुपर ओव्हरमध्ये गेला असता, पण तसे झाले नाही. सीन ॲबॉटच्या चेंडूवर रिंकूने षटकार ठोकला. दुर्दैवाने त्या सहा धावा रिंकूच्या खात्यात जमा झाले नाहीत. कारण ॲबॉटचा पाय रेषेच्या बाहेर गेला होता आणि पंचांनी तो नो-बॉल घोषित केला. अशा परिस्थितीत भारताच्या खात्यात षटकार ऐवजी एक धाव जमा झाली आणि टीम इंडियाने एक चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. रिंकू सिंगने १४ चेंडूत २२ धावा केल्यानंतर नाबाद परतला.

११२ धावांची भागीदारी केली. सूर्यकुमारने ४२ चेंडूत ८० धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत नऊ चौकार आणि चार षटकार मारले. इशान किशनने ३९ चेंडूत ५८ धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. तिलक वर्माने १२ आणि अक्षर पटेलने २ धावा केल्या. रवी बिश्नोई आणि अर्शदीप सिंग यांना खातेही उघडता आले नाही. मुकेश कुमार शून्यावर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून तन्वीर संघाने दोन विकेट घेतल्या. जेसन बेहरेनडॉर्फ, मॅथ्यू शॉर्ट आणि सीन ॲबॉट यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# मार्लन सॅम्युअल्सवर सहा वर्षांची बंदी!

## भ्रष्टाचारात दोषी आढळल्याने त्याच्यावर घालण्यात आली बंदी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**वेस्ट इंडिजचा दिग्गज क्रिकेटपटू मार्लन सॅम्युअल्सवर आयसीसीने सहा वर्षांची बंदी (MARLON SAMUELS BANNED) घातली आहे. सॅम्युअल्सने वेस्ट इंडिजसाठी अनेक प्रसंगी चमकदार कामगिरी केली आहे. निवृत्तीनंतर तो देशांतर्गत लीगमध्ये खेळत आहे. मात्र आता तो भ्रष्टाचारात दोषी आढळल्याने त्याच्यावर बंदी घालण्यात आली आहे. सॅम्युअल्स पुढील सहा वर्षे कोणत्याही फॉरमॅटमध्ये खेळू शकणार नाही. अमिराती क्रिकेट बोर्डाच्या भ्रष्टाचारविरोधी संहितेशी संबंधित नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सॅम्युअल्स दोषी आढळला आहे.**

सॅम्युअल्सवर (MARLON SAMUELS BANNED) लादण्यात आलेल्या बंदीची माहिती देताना आयसीसीच्या एचआर आणि इंटिग्रिटी युनिटचे प्रमुख ॲलेक्स मार्शल म्हणाले की, सॅम्युअल्स जवळपास दोन दशके आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळला आहे. यादरम्यान त्याने अनेक भ्रष्टाचारविरोधी सत्रांमध्ये भाग घेतला आणि भ्रष्टाचारविरोधी संहितेअंतर्गत त्याला त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव होती. तो आता निवृत्त झाला असला तरी, सॅम्युअल्स त्यावेळी गुन्ह्यात भागीदार होता. त्यामुळे सहा वर्षांची बंदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही क्रिकेटपटूला एक मजबूत संदेश म्हणून काम करेल, असा विश्वास ॲलेक्स मार्शल यांनी व्यक्त केला. आयसीसीने सप्टेंबर 2021 मध्ये केलेल्या आरोपानुसार सॅम्युअल्सने (MARLON SAMUELS BANNED) अमिराती



क्रिकेट बोर्डाच्या भ्रष्टाचार विरोधी संहितेच्या कलम 2.4.2, 2.4.3, 2.4.6 आणि 2.4.7 चे उल्लंघन केले होते. आयसीसीचे विभाग भ्रष्टाचारविरोधी अधिकाऱ्यांना भेटवस्तू, पेमेंट, आदरातिथ्य किंवा इतर फायद्यांचा अहवाल न देण्याचा संदर्भ देतात, ज्यामुळे खेळाची प्रतिमा मलीन होऊ शकते. यासोबतच तपासात सहकार्य न करणे, माहिती लपवून तपासात अडथळा आणणे किंवा विलंब करणे यांसारख्या कलमांचाही संबंध होता. सॅम्युअल्स त्याच्या कारकिर्दीत अनेकदा वादात सापडला आहे. मे 2008 मध्ये, भेटवस्तू, पैसे स्वीकारल्याबद्दल तो दोषी आढळला होता. त्यानंतर सॅम्युअल्सवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली होती. 2014 मध्ये, त्याने तत्कालीन कर्णधार ड्वेन ब्राव्होच्या बोर्डासोबतच्या पेमेंट वादाच्या प्राश्वभूमीवर भारत दौऱ्यातून माघार घेण्याच्या

### सॅम्युअल्स अनेकदा सापडला वादात

सॅम्युअल्स त्याच्या कारकिर्दीत अनेकदा वादात सापडला आहे. मे 2008 मध्ये, भेटवस्तू, पैसे स्वीकारल्याबद्दल तो दोषी आढळला होता. त्यानंतर सॅम्युअल्सवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली होती. 2014 मध्ये, त्याने तत्कालीन कर्णधार ड्वेन ब्राव्होच्या बोर्डासोबतच्या पेमेंट वादाच्या प्राश्वभूमीवर भारत दौऱ्यातून माघार घेण्याच्या निर्णयालाही विरोध केला होता. यानंतर आयसीसीने 2015 मध्ये त्याची गोलंदाजी बेकायदेशीर ठरवली होती आणि त्याच्यावर एक वर्षासाठी गोलंदाजी करण्यास बंदी घातली होती.

निर्णयालाही विरोध केला होता. यानंतर आयसीसीने 2015 मध्ये त्याची गोलंदाजी बेकायदेशीर ठरवली होती आणि त्याच्यावर एक वर्षासाठी गोलंदाजी करण्यास बंदी घातली होती. सॅम्युअल्सने 2012 आणि 2016 मध्ये वेस्ट इंडिजसोबत दोन टी-20 विश्वचषक जिंकले आहेत. या दोन्ही विजेतेपदाच्या फायनलमध्ये त्याने विंडिजसाठी सर्वाधिक धावा केल्या. त्याने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना 14 डिसेंबर 2018 रोजी बांगलादेशविरुद्ध खेळला होता. त्यानंतर नोव्हेंबर 2020 मध्ये त्याने निवृत्ती जाहीर केली. सॅम्युअल्सने 71 कसोटी, 207 एकदिवसीय आणि 67 टी-20 सामने खेळले. त्याने कसोटीत 32.64 च्या सरासरीने 3917 धावा, एकदिवसीय सामन्यात 32.97 च्या सरासरीने 5606 धावा आणि टी-20 मध्ये 116.23 च्या स्ट्राईक रेटने 1611 धावा केल्या आहेत.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | FRIDAY, 24th NOVEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# Contribute to the national cause of building a strong India!

## BJP City President Shankar Jagtap Appeals to budding executives of the party; Allocation ceremony of the newly elected executive

**Pimpri : Vishnav Jadhav**



"Each office-bearer included in the BJP city executive committee has a special skill. That expertise should be used for party organization empowerment. As the election is heading in near future, there will be a big responsibility on both; the executives and the workers. Accordingly, we have resolved to make the ambitious development projects and welfare schemes of the Central and State Governments accessible to the people at the grass-root level, along with enabling the booth system. **- Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad.

Giving 100 percent contribution and adopting the policy of help and cooperation while working in the organization is needed. Executive and worker are the two wheels of our organization. Our 'goal' can be achieved through both of them. India is developing as a powerful nation in the world under the leadership of Hon. Prime Minister Narendra Modi. These words by BJP city president Shankar Jagtap made an appeal to the newly elected executives of the party to contribute to this national cause.

Pimpri-Chinchwad BJP city president Shankar Jagtap had announced the executive committee after taking charge of his post. The post allotment program of this executive committee was held at the party's central public relations office in Morwadi on Wednesday. Jagtap was speaking on the occasion.

Senior Vice President and Spokesperson Raju Durge, BJP City General Secretary Sheetal Shinde, Shaila Molak, Ajay Patade, Sanjay Mangodikar, Namdev Dhake, Maval Assembly Organizer Sadashiv Khade, Chinchwad Assembly Election Chief Kaluram Barne, Party's Youth Front City President Tushar Hinge, Scheduled Caste front City President Bhima Bobde, Mahila Morcha President Suj ata Palande, Mandal President Prasad Kaspte, Somnath Bhondve, Sandeep Nakhate, Santosh Tapkir etc were present for the program.

City President Shankar Jagtap said that the Executive committee firstly inculcate policies and values of the party. Carrying these values to the last voters is the great responsibility of the commettee. Once these values and policies are passed down to the last voter, the voter gets bound to the party till the end, the main objective of the present executive committee is to connect the voter.

The program was anchored by Sanjay Mangodikar and vote of thanks was given by Ajay Patade.

# Pune Airport Addresses Passenger Concerns: Expedites Inclusion of Airlines in DigiYatra Facility

**Pune :**

To enhance entry and security processes at Pune Airport, the DigiYatra facility was introduced, leveraging facial recognition technology for passenger identification. While the facility commenced operations in April, the comprehensive inclusion of all airlines has been a gradual process, causing inconvenience to passengers, particularly those flying with Capital A's Air Asia, Alliance Air, and Star Air.

Despite being operational for seven months, these three airlines are yet to integrate with the Digiatra facility, leading to delays and longer queues for passengers who are not able to benefit from the swift check-in process facilitated by DigiYatra. Presently, only IndiGo, Vistara, SpiceJet, Air India, and Akasa Air are part of the DigiYatra system.The issue was brought to light by air traffic expert Darhysheel Vandekar, who addressed a letter to the Chairman of the Airport Authority of India, Sanjeev Kumar. In the letter, Vandekar highlighted the inconvenience faced by thousands of passengers due to the non-participation of some airlines in the DigiYatra facility.

Responding to the concerns raised, Chairman Sanjeev Kumar assured immediate action in his letter. He acknowledged that efforts are underway to include Air Asia in the DigiYatra facility promptly. Additionally, follow-up activities are being conducted with Alliance Air to facilitate their integration into Digiatra. Star Air, although operating with limited services, is also under consideration for inclusion in the DigiYatra facility to provide a seamless experience to passengers.

